36

UGC CARE LISTED
ISSN No.2394-5990

# संशोधक

• वर्ष : ९० • मार्च २०२२ • पुरवणी विशेषांक ०५





ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE
Reg.No. 2/12883
Estd. June - 1998
Tal.Gadhinglaj, Dist.Kolhapur.
GADHINGLAJ

स्थापना : १ जानेवारी १९२७

इतिहासाचार्य वि. का.राजवाडे संशोधन मंडळ, धुळे

 ISSN No. 2394-5990

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कृषीविषयक विचार

डॉ. काशिनाथ रामचंद्र तनंगे
प्रमुख, अर्थशास्त्र विभाग,
कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज, जि.कोल्हापूर
ई. मेल : tanangek@gmail.com

**प्रस्तावना :**

डॉ.भीमराव रामजी आंबेडकर हे आधुनिक भारताचे निर्माते होत. विसाव्या शतकातील महानायक, हजारो वर्षापासून दलित, उपेक्षित, वंचित व परिघाबाहेर असणाऱ्या समाजाची ठसठसती वेदना मांडणारा बहिष्कृत भारताचा मूकनायक, जाती आणि वर्णव्यवस्थेने गुलाम बनलेल्या माणसाचा पहिला बोलका स्वर, शतकानुशतके अज्ञान, दारिद्र्य, गुलामगिरी आणि शोषणाच्या चक्रव्यूहात पुरते अडकलेल्या माणसाचा मुक्तिदाता, बाबासाहेबांच्या व्यक्तिमत्वाला अनेक पैलू होते. ज्ञानाबद्दल प्रचंड लालसा असणारा हा आधुनिक विज्ञानेश्वर होय. ज्ञानचं माणसाला मुक्त करू शकते आणि सर्व अविद्येचे तेच मुख्य कारण आहे. ही त्यांची समाजशास्त्रीय मीमांसा स्पष्ट करणारा पंडित, विचार आणि विवेकाचा मिलाप असलेले व्यक्तिमत्व म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकर होत.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या लिखाणातून, कार्यातून समाज परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न केला. तसेच अर्थतज्ञ म्हणून त्यांनी देशाच्या आर्थिक व्यवस्थेला गरिबीमुक्त, विषमता मुक्त आणि शोषणमुक्त करून राष्ट्राची आर्थिक पाया भरणे करता यावी यासाठी शेती, जलधोरण, उद्योग, सार्वजनिक उत्पन्न व खर्च, चलनविषयक धोरण तसेच बँकिंग क्षेत्राची संबंधित महत्त्वाचे लिखाण करून आपले विचार मांडले, तेच विचार त्यांचे आर्थिक विचार म्हणून आज ही राष्ट्राच्या प्रगतीसाठी दिशादर्शक ठरत आहेत. प्रस्तुत संशोधन पेपरमध्ये आधुनिक भारताचे निर्माते अर्थतज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर भूमिका विषद करण्याचा प्रयत्न केला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा शैक्षणिक प्रवास अभ्यासणे.
२. अर्थतज्ञ डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज परिवर्तनातील भूमिका अभ्यासणे.
३. प्रा. केन्स, डॉ.आंबेडकर आणि विनिमयदर पद्धतीच्या विचारातील सहसंबंध अभ्यासणे.
४. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे कृषी विषयक विचार याचा आढावा घेणे.

**संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा :**

प्रस्तुत शोधनिबंधाची व्याप्ती डॉ.बाबासाहेब आंबेडकर आर्थिक विचारापुर्ती मर्यादित आहे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोधनिबंध वर्णनात्मक संशोधन पद्धतीवर आधारीत आहे. संशोधन पेपर दुय्यम माहितीवर आधारित असून दुय्यम माहिती संकलनासाठी शासकिय अहवाल, संशोधन पेपर, वर्तमानपत्रातील लेख, इत्यादीचा आधार घेतला आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा शैक्षणिक प्रवास :**

भारतातच नव्हे संपूर्ण जगात आपल्या विचाराने व कार्यकर्तृत्वाने ओळखल्या जाणाऱ्या भारतीय महापुरुष यामध्ये भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे एक आहेत. त्यांना भारतीय लोक महामानव या नावाने ओळखत असून जगात त्यांची ओळख नॉलेज ऑफ सिम्बॉल अशी आहे. त्यांचा जन्म सी.१४ एप्रिल १८९१ रोजी मध्यप्रदेश राज्यातील महू या गावात आई भिमाबाई वडील रामजी यांच्या पोटी झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण सातारा येथील सातारा हायस्कूलमध्ये झाले. पुढे १९०४ मध्ये त्यांचे कुटुंब मुंबईमध्ये स्थायिक झाल्यामुळे पदवीपर्यंतचे शिक्षण मुंबई मध्येच पूर्ण केले. मुंबई विद्यापीठात विद्यापीठातून त्यांनी राज्यशास्त्र व अर्थशास्त्र या विषयातून बी.ए. ची पदवी प्राप्त केली. पुढील शिक्षणासाठी ते अमेरिकेला गेले. अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठात अर्थशास्त्र विषयातून विषयातून एम. ए. व पी. एचडीची पदवी प्राप्त केली. त्यानंतर ते शिक्षणासाठी इंग्लंडला गेले. इंग्लंडमधील लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स मध्ये अर्थशास्त्र विषयातून डॉक्टर ऑफ सायन्सची' पदवी पूर्ण केली. त्याच वेळेस त्यांनी ग्रेस इन लॉ मध्ये बॅरिस्टरची पदवी मिळवली. त्यांच्या शिक्षणासाठी बडोदा संस्थानाचे संस्थानिक श्रीमंत सयाजीराव गायकवाड व कोल्हापूर संस्थानाचे संस्थानिक छत्रपती शाहू महाराज यांनी आर्थिक मदत केली. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सुरुवातीला

ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE GADHINGLAJ Reg.No. 2/12883 Estd. June - 1998 Tal.Gadhinglaj, Dist.Kolhapur.

ISSN No. 2394-5990

शेती, सरकारी विमा योजना, स्वदेशी-परदेशी बांधापर्यंत, तसेच देशातील पाण्याची उपलब्धता, मागणी संवर्धन, नद्याजोड प्रकल्प, नदी खोरे प्राधिकरण, नद्यांचा बहुउद्देशीय विकास, केंद्रीय विद्युत प्राधिकरण व वीज शक्ती नियोजन अशा अनेक मुद्द्यावर व्यवस्थित भाष्य करून ठेवले आहे. तसेच बाबासाहेब हे भांडवलशाही विरोधी होते असे मत अनेक विचारवंतांनी प्रतिपादन केलेले आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शेतीविषयक चिंतन किती मूलगामी होते. जागतिक चळवळींना बळ देत असताना, शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे जाणिवेतून ते पाहतात. शेतीची उत्पादनक्षमता वाढावी म्हणून शेत जमिनीचे सपाटीकरण. बांधबंदिस्ती, सिंचनाची सोय, भांडवली गुंतवणूक केली तरच, शेती लाभदायी ठरेल अशी त्यांची धारणा होती. जलसिंचनाच्या सुविधा निर्माण झाल्याशिवाय किफायतशीर शेती होऊ शकत नाही, यासाठी त्यांनी बहुउद्देशीय प्रकल्पांची उभारणी केली. अंतरराज्य नदीजोड प्रकल्पाची कल्पना ही त्या काळात बाबासाहेबांनी मांडली. खुशाल श्रम आणि प्रगत तंत्रज्ञानाने शेती सुधारली जाऊ शकते, हे त्यांचे म्हणणे होते. कृषी क्षेत्राच्या यांत्रिकीकरण करूनच विकास साधला जाऊ शकतो, किंबहुना यंत्रांच्या साह्याने शेती केल्याशिवाय उत्पादनात वाढ होणे शक्य नाही, ही त्यांची मूलभूत विचार होती. शासकीय समाजवादाचे धोरण अवलंबिले, सामुदायिक शेतीकडे वळावे लागेल हा संदेश ते देतात.

विद्यमान केंद्र व राज्य सरकार तसेच अर्थशास्त्रज्ञ, आर्थिक सल्लागार यांना अर्थव्यवस्था सुधारावयाची असेल तर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारख्या महापुरुषाच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांचे अनुकरण करणे गरजेचे आहे. तसेच देशाची होत असलेली आर्थिक अधोगती थांबवावी आणि इथल्या सर्वसामान्य शेतकरी, शेतमजूर, कामगार, दलित, गरीब यांचे जीवन कसे सुखकर होईल. यावर प्राधान्याने काम करावे लागेल, आणि आर्थिक विषमता मोडीत काढावी लागेल हेच खऱ्या अर्थाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन ठरेल.

**संदर्भ :**


१. श्री.प्रसाद कुलकर्णी (एप्रिल२०१५), डॉ.आंबेडकरांची विचारधारा, प्रबोधन प्रकाश ज्योती, अंक ३२९, पृष्ठ क्रमांक ९ ते २३.

२. प्रा. डॉ. अमर कांबळे (ऑक्टोंबर-नोव्हेंबर २०१६), डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा नैतिक विवेकवादाचा दृष्टीकोण, प्रबोधन प्रकाशन ज्योती, दिवाळी विशेषांक २०१६, अंक ३४७, पृष्ठ क्रमांक ६९ ते ७२.

३. प्रा. डॉ. सतीश यादव, शेतकऱ्यांचे बाबासाहेब, महाराष्ट्र टाइम्स, ११ एप्रिल २०२१, पृष्ठ क्रमांक ०१.

४. शंकर खरात, डॉ.बाबासाहेबांचे राजकीय विचार.

५. डॉ.बाबासाहेब आंबेडकर भाषणे खंड १८ भाग ०३.

६. डॉ. विजय खरे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि राष्ट्रीय सुरक्षा.

७. डॉ. सत्यरंजन साठे, भारतीय राज्यघटनेची पन्नास वर्षे.

८. जनता अंक, दिनांक १३ जून १९५३ व ६ नोव्हेंबर १९५४.


●●●

ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE Reg.No. 2/12883 Estd. June - 1998 Tal.Gadhinglaj, Dist.Kolhapur. GADHINGLAJ

I/C. PRINCIPAL
Arts, Commerce & Science College
Gadhinglaj, Dist. Kolhapur.